**MHST060008612022**

दाखल तारीख : ०३/११/२०२२

नोंदणी तारीख : ०३/११/२०२२

निकाल तारीख : ११/०४/२०२३

कालावधी : ०० व. ०५ म.०९ दि.

# दहिवडी ता. माण, जि. सातारा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी कु. एस.एस. बजाज)

**नियमित फौजदारी प्रकरण क्र. ७१/२०२२** **निशाणी क्र. ४३**

महाराष्ट्र सरकारतर्फे
सहाय्यक पोलीस निरीक्षक,
दहिवडी पोलीस ठाणे,
दहिवडी, ता. माण, जि. सातारा. ... **अभियोगपक्ष**

**विरुध्द**

१. गणेश मधुकर चव्हाण,
वय : २५ वर्षे, व्यवसाय : मजुरी,
रा. कर्मवीरनगर, दहिवडी,
ता. माण, जि. सातारा.

२. सागर जालिंदर पाटोळे,
वय : २८ वर्षे, व्यवसाय : मजुरी,
रा. वेजेगाव, ता. खानापुर, जि. सांगली. ... **आरोपी**

---

सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता : सौ. एस.एस. कुलकर्णी.
आरोपींतर्फे वकील : श्री. एस.आर. शेटे.

---

**दोषारोप : भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये...**

## न्या य नि र्ण य

**(दिनांक ११ एप्रिल २०२३)**

सदरहू खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये चालविण्यात आला आहे.

**अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :-**

०२. दि. ११/०६/२०२१ रोजी रात्री ११.३० ते दि. १२/०६/२०२१ रोजीचे पहाटे ५.३० वाजेच्या दरम्यान मौजे पिंगळी बुद्रुक, ता. माण, जि. सातारा गावचे हद्दीतील फिर्यादीच्या घरासमोरील अंगणामधून आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीच्या मालकीची एक डुगल जातीची म्हैस व एक साधी म्हैस अशा दोन म्हैंशी त्याचे संमतीशिवाय लबाडीने चोरी करुन नेल्या. म्हणून फिर्यादी दिलीप विठ्ठल सजगणे यांनी पोलीस ठाणे, दहिवडी येथे आरोपींविरुध्द फिर्याद दिली.

०३. उपरोक्त फिर्यादवरून पोलीसांनी गुन्हा क्र. १६३/२०२१ हा भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ प्रमाणे नोंदविला. तपासी अंमलदार सौ. वाय.आर. मोरे यांनी तपासादरम्यान घटनास्थळी जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करुन छायाचित्रे काढली. तसेच, साक्षीदारांचे बयान नोंदवून घेतले. तपास पूर्ण झाल्यावर आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

०४. आरोपींची उपस्थिती सुनिश्चित केल्यानंतर निशाणी क्र. १७ प्रमाणे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ प्रमाणे आरोप ठेवला आहे. त्यातील मजकूर आरोपींना समजेल अशा भाषेत वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी आरोप अमान्य केला व अपराधाची संपरिक्षा करण्याची विनंती केली.

०५. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द दोषसिध्दी करण्यासाठी खालीलप्रमाणे चार साक्षीदार तपासले आहेत.

सा.क्र. १ दिलीप विठ्ठल सजगणे (फिर्यादी) यांना निशाणी क्र. २० वर तपासण्यात आले आहे,

सा.क्र. २ संगिता दिलीप सजगणे यांना निशाणी क्र. २४ वर तपासण्यात आले आहे,

सा.क्र. ३ अविनाश धनाजी दरेकर (निवेदन पंच) यांना निशाणी क्र. ३१ वर तपासण्यात आले आहे व

सा.क्र. ४ यशोदा राजाराम मोरे (तपासी अधिकारी) यांना निशाणी क्र. ३८ वर तपासण्यात आले आहे.

त्यानंतर प्रस्तुत प्रकरणात निशाणी क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये जबानी अनुक्रमे निशाणी क्र. ४१ व ४२ प्रमाणे नोंदविण्यात आली. त्यामध्ये आरोपींनी सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तर देवून खोटी केस केल्याचा बचाव घेतला.

०६. अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता सौ. एस.एस. कुलकर्णी व आरोपींतर्फे वकील श्री. एस.आर. शेटे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला.

०७. अभियोगपक्ष व आरोपींचे वकिल यांचा युक्तीवाद ऐकल्यावर प्रस्तुत खटल्याच्या निकालाकामी खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निर्माण झाले व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दि.११/०६/२०२१ रोजी रात्री ११.३० ते दि. १२/०६/२०२१ रोजीचे पहाटे ५.३० वाजेच्या दरम्यान मौजे पिंगळी बुद्रुक, ता. माण, जि. सातारा गावचे हद्दीत फिर्यादीच्या घरासमोरील अंगणामधून आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादीच्या मालकीची एक डुगल जातीची म्हैस व एक साधी म्हैस अशा दोन म्हैंशी त्याa चे संमतीशिवाय लबाडीने चोरी करुन नेल्या, अशा प्रकारे त्याने भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ अंतर्गत शिक्षेस पात्र गुन्हा केला आहे? | ... **नकारार्थी.** |
| २) | आदेश काय ? ......................... आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. | |

**– : का र ण मि मां सा :–**

**मुद्दा क्र. १ करीता :–**

०८. प्रस्तुत प्रकरणातील सा.क्र. १ दिलीप विठ्ठल सजगणे हे फिर्यादी असुन त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, अंदाजे दिड वर्षापूर्वी रात्री ११.०० वाजेच्या सुमारास त्यांनी जनावरांना शेडमध्ये बांधले व नंतर चारा पाणी करुन झोपण्यासाठी गेले होते. सकाळी ४.०० ते ५.०० वाजेच्या सुमारास ते उठून परत जनावरे पाहण्यासाठी गेले असता त्यांना दोन म्हैशी मिळून आल्या नाहीत. त्यामुळे त्यांनी म्हैशींचा आजु–बाजुला तपास घेतल्यानंतर देखील म्हैंशी मिळून आल्या नाहीत. म्हणून त्यांनी दुस–या दिवशी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली. त्याने फिर्याद (नि.क्र. २१) व छापील फिर्याद (नि.क्र. २२) असे पुराव्यादरम्यान ओळखले आहे. २–३ महिन्यानंतर

पोलीसांनी त्यास एक म्हैस शोधून दिली असल्याचे त्याने कथन केले आहे. फिर्यादीचा उलटतपास पाहता फिर्याद दिल्यानंतर पोलीसांनी त्याचा कधीही जबाब नोंदविलेला नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे अभिलेखावर दाखल असलेल्या फिर्यादीच्या पुरवणी जबाबावर साशंकता निर्माण होते.

०९. साक्षीदार क्र. २ संगिता दिलीप सजगणे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, अंदाजे दिड वर्षापूर्वी श्रावण महिन्यात ११ तारखेला तिच्याकडे गायी व दोन म्हैंशी असून दोन्ही म्हैशी पटांगणामध्ये बांधलेल्या होत्या. रात्री ११.०० वाजता तिच्या पतीने जनावरांना चारा–पाणी दिले व सकाळी ५.०० वाजेच्या सुमारास म्हैंशी नसल्याचे दिसून आलेले. त्यामुळे त्यांचा शोध सगळीकडे घेतला व १२ तारखेला त्याबाबत पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हयाची तक्रार नोंदविली होती. दिड महिन्यानंतर एक म्हैस त्यांना मिळाली असल्याचे कथन केले आहे. या साक्षीदाराच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता त्या पोलीस ठाण्यात कधीही गेल्या नसल्याचे कबुल केले आहे. तसेच, तिच्या म्हैंशी कोणी चोरुन नेल्या हे तिला माहित नसल्याचे देखील कबुल केले आहे.

१०. अभियोगपक्षाने निवेदन पंचनाम्यासंबंधी पंच साक्षीदार अविनाश धनाजी दरेकर (सा.क्र. ३) यांचा पुरावा देणेत आलेला आहे. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, पोलीसांनी त्यांना कोठेही बोलाविले नव्हते, त्यांचे समक्ष पोलीसांनी कोणतीही कारवाई केली नाही. पोलीसांनी त्याची केवळ निवेदन पंचनाम्यावर सही घेतली असून त्यातील मजकूर त्यास माहित नसल्याचे कथन करुन अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या पूर्व परवानगीने सदरील

साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारुन निवेदन पंचनामा सिध्द् करण्यासाठी पुरावा अभिलेखावर आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतू, त्यांच्या उलटतपासातून काहीही निष्पन्न झाले नाही.

११. अभियोग पक्षातर्फे सा.क्र. ४ यशोदा राजाराम मोरे हया तपासी अधिकारी असून त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. १३.०६.२०२० रोजी त्या दहिवडी पोलीस, ठाणे येथे म.पो.ना. या पदावर कार्यरत असतांना ठाणे अंमलदार श्री. ढोले यांनी सदर प्रकरणातील गुन्हा नोंदवून तपासकामी त्यांना लेखी आदेशान्वये (नि.क्र. ३९) दिलेला. तपासादरम्यान घटनास्थळावर जावुन दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा (नि.क्र. २५) तयार करुन छायाचित्रे (आर्टीकल 'अ' व 'ब') काढल्याचे कथन केले आहे. तसेच, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपींना अटक करुन न्यायालयासमक्ष हजर केले. चोरी गेलेल्या दोन म्हैशी पैकी एक म्हैस मिळून आल्याने सदरची म्हैस फिर्यादीस ताबा पावती (निशाणी क्र. ४०) नुसार परत करण्यात आली. त्यानंतर साक्षीदारांचे पुरवणी जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपींविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केल्याचे कथन केले आहे. तपासी अधिकारी यांच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता जप्त केलेल्या म्हैसीसारखी म्हैस ही सहजरित्या उपलब्ध होऊ शकत असल्याचे कबुल केले व इतर सुचक प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली आहेत.

१२. अभिलेखावरील एकुण पुराव्याचे अवलोकन केले असता अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांनी आरोपींनीच फिर्यादीच्या घरासमोरील अंगणातील

दोन म्हैशी चोरुन नेल्याचे प्रत्यक्षात बघितले नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आरोपींनी फिर्यादीच्या घरासमोरील अंगणातील दोन म्हैशी चोरुन नेल्या असा सशक्त व सबळ पुरावा न्यायालयासमक्ष नाही. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत करण्याकरीता इतर कोणतेही स्वतंत्र साक्षीदारांचा पुरावा दिला नाही अगर त्यांची साक्ष नोंदविली नाही. एकुणच घटनेशी आरोपींचा संबंध प्रस्तापित करण्यास अभियोग पक्षास अपयश आलेले आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. २ करीता :-**

१३. वरील मुद्दा क्र. १ च्या नकारार्थी निष्कर्षावरुन हे स्पष्ट होते की, अभियोगपक्षाने आरोपींवर लावलेल्या दोषारोपाची सिद्धी केलेली नाही. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक डुगल जातीची म्हैस ही निशाणी क्र. ४० वरील ताबा पावतीनुसार मुळ मालक फिर्यादी यास परत केली आहे. त्यामुळे त्याबाबतचा आदेश पारीत न्यायोचित होणार नाही. परिणामी मुद्दा क्र. २ चे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) आरोपी क्र. १ गणेश मधुकर चव्हाण व आरोपी क्र. २ सागर जालिंदर पाटोळे यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ या अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपींचे वैयक्तिक व जमानती बंधपत्रे रद्द करण्यात येत आहेत.

३) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७ (अ) प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये ७,५००/– ची जमानत द्यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

SHEETAL SHREERAM BAJAJ

Digitally signed by SHEETAL SHREERAM BAJAJ
Date: 2023.04.18 17:52:22 +0530

**(कु. एस.एस. बजाज)**

दिनांक : ११.०४.२०२३. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी.

**–: प्र मा ण प त्र :–**

सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजुकरातील शब्द न् शब्द मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | ए.एन. ओंबासे, |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी, ता. माण, जि. सातारा. |
| मा. साहेबांनी चेक केलेचा दिनांक | : | १७/०४/२०२३. |
| पी.डी.एफ. दिनांक | : | १८/०४/२०२३. |

सही/–

लघुलेखकाची सही